## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१६-१७(का.अ. ते प्र.अ)/मफुसल/२२५/२०१६                    मुंबई , दिनांक : ४ /०६/२०१७

**वाचा :-** या कार्यालयाचे समक्रमांकित, दिनांक २२.०६.२०१७ चे आदेश.

## -:आदेश:-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील श्री शरद तुकाराम बोडके, कार्यालय अधीक्षक, नेमणूक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र .५, दौंड यांना या कार्यालयाच्या समक्रमांकित, दिनांक २२.०६.२०१७ च्या आदेशांन्वये वरिष्ठ कार्यालय अधीक्षक /प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती देऊन त्यांची पोलीस अधीक्षक, एसीबी, अमरावती कार्यालयामध्ये नेमणूक करण्यात आली होती.

२. तथापि, श्री शरद तुकाराम बोडके, कार्यालय अधीक्षक यांनी कौटुंबिक कारणांस्तव वरिष्ठ कार्यालय अधीक्षक / प्रशासकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीस जाण्यास इच्छुक नसल्यामुळे पदोन्नतीवर झालेल्या बदलीचे आदेश रद्द करण्याबाबत विनंती केली आहे.

३. सबब, श्री शरद तुकाराम बोडके, कार्यालय अधीक्षक, नेमणूक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र .५, दौंड यांनी वरिष्ठ कार्यालय अधीक्षक /प्रशासकीय अधिकारी या पदावरील पदोन्नती नाकारली असल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार त्यांचे वरिष्ठ कार्यालय अधीक्षक /प्रशासकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीचे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत असून, त्यांचे नांव शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार सन २०१६-१७ चे निवडसूचीवरुन वगळण्यात येत आहे. तसेच त्यांचा सन २०१७-१८ व सन २०१८-१९ ची निवडसूची बनविताना विचार करण्यात येणार नाही.

४. श्री बोडके यांना कार्यमुक्त केले असले तरी, त्यांनी पदोन्नती नाकारल्याने त्यांची आस्थापना समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ५, दौंड कार्यालय अशी राहील.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

श्री शरद तुकाराम बोडके, कार्यालय अधीक्षक,
नेमणूक, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र .५, दौंड.
**( मार्फत : समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र .५, दौंड.)**

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र .५, दौंड.
२. समादेशक, यांनी कार्यालय अधीक्षक, श्री बोडके यांच्या सेवापुस्तकात पदोन्नती नाकारल्याची नोंद घ्यावी.
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० /१२/३६

प्रत सविनय सादर,
महासंचालक, अँन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**(अनुप कुमार सिंह )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.